POLICE STATION AWDHUTWADI,YAVATMALDIST.YAVATMAL
पोलीस स्टेशन अवधुतवाडी, यवतमाळ जि. यवतमाळ
PH.No.-07232-256714 Email-ps.owadgaonroad.ytml@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

दिनांक. 09/05/2023

**दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात जाणा-या देशी दारुसह दोघांना घेतले ताब्यात**
**अवधुतवाडी पोलीसांची कारवाई, देशी दारुच्या 30 पेट्या व टवेरा कारसह 06 लाखाचा मुद्देमाल केला जप्त**

दिनांक 09/05/2023 रोजी पो.नि. मनोज केदारे सोबत पोस्टाफ सह पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिग करीत असतांना मुखबिर कडून खबर मिळाली की आर्णी बायपास कडुन चापडोह कडे नागपुर रोड ने पांढ-या रंगाची टवेरा चारचाकी वाहन क्र. एमएच-26 एएफ-3181 मध्ये भरुन अवैद्य देशी दारू चे पेट्या घेवुन आर्णी बायपास रोड कडुन चापडोह कडे जात आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पंचाना बोलावुन आम्ही चापडोह जवळ घांटजी टि पॉईट येथे नमूद पंच व पो.स्टफ सह थांबलो असता मुखबिरकडुन मिळालेल्या खबरेप्रमाणे एक इसम पांढ-या रंगाची टवेरा चारचाकी वाहन क्र. एमएच-26 एएफ-3181 असा इसम हा त्याचे ताब्यातील वाहन नागपुर रोड बायपास कडुन येत असतांना दिसला त्या नमूद वाहन चालक इसमास चापडोह येथे थांबविले असता त्यास थांबविण्याचे कारण सांगुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव शेख अबरार शेख ईस्माईल वय 35 वर्षे व्यवसाय- मजुरी रा. वाढोणा बाजार ता. राळेगाव जि. यवतमाळ असे व वाहनात बसुन असलेल्या दुस-या इसमाने त्याचे नाव बादल रामदास आत्राम वय 27 वर्षे व्यवसाय- मजुरी रा. वाढोणा बाजार ता. राळेगाव जि. यवतमाळ असे सांगीतले असता पंचा समक्ष त्याची झडती घेतली असता वाहना मध्ये देशी दारु गोवा नं. 1 संत्रा कंपनीचे 180 एम.एल.चे 27 पेट्या व 90 एम.एल.चे 03 पेट्या आणी टवेरा चारचाकी वाहन क्र. एमएच-26 एएफ-3181असा एकुण कि.6,01,220/- रु. चा मुद्देमाल मिळुन आले आहे. नमूद इसमा विरुध्द दारुबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.डॉ.पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक, यवतमाळ, मा.श्री. पियुष जगताप, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ, मा.श्री. संपतराव भासले उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मनोज केदारे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे.अवधुतवाडी, सफौ/82 रवि आडे, पोहवा/गजानन दुधकोहळे, पोशि/अविनाश ढोणे, पोशि/ सुरज शिंदे, पोशि/1407 बबलु पठाण, पोशि/1414 प्रशांत राठोड, चापोशि/2594 गणेश राठोड यांनी पार पाडली आहे.

**(मनोज केदारे)**
पोलीस निरीक्षक,
पो.स्टे.अवधुतवाडी, यवतमाळ